दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२९८ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, गुरुवार, १८ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-




## धक्कादायक ! मुंबईतील वाढती वाहनांची संख्या ठरतेय प्रदूषणाचे प्रमुख कारण

**■ मुंबई, यश सावंत :** गेल्या काही दिवसांपासून मुंबईतील हवेची गुणवत्ता प्रचंड खालावली आहे. शहरातील वाढती बांधकामे, सार्वजनिक प्रकल्प आणि रस्त्यांवरुन बेलगाम धावणारी वाहने आणि त्यातच वाढती वाहनांची संख्याही प्रदूषणाचे प्रमुख कारण ठरतं आहे. ज्यामुळे हवेची तर गुणवत्ता घसरण्यात दिल्लीनंतर मुंबई शहराचा क्रमांक लागतो. मुंबईतील लोकसंख्येत सातत्याने वाढ होत असून, त्या तुलनेत मुंबईत रस्ते, पूल, पर्यायी मार्ग उभारणीचा वेग संथगती आहे. परिणामी मुंबईकरांना अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे.

नुकताच गुढीपाडाव्यानिमित्त मुंबईतील चार आरटीओमध्ये १ ते ९ एप्रिल या कालावधी आठ हजारांहून अधिक वाहनांची नोंद झाली. सर्वाधिक चारचाकी वाहनांची नोंद मुंबई सेंट्रल आरटीओमध्ये झाली. वाढत्या उष्णतेत गारेगार, आरामदायी प्रवास व्हा म्हणून चारचाकी वाहनांची मागणी वाढत चालली आहे. वाढती गाड्यांची संख्या वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनण्याची शक्यता आहे. त्याचबरोब दिवसेंदिवस हवा आणि ध्वनिप्रदूषणात वाढ होऊन त्याचे मानवी आरोग्यावर परिणाम दिसून येत आहे.

वाहतूक कोंडीमुळे बराच वेळएकाच ठिकाणी खोळंबलेल्या वाहनांतून धूर बाहेर पडतो आणि तो प्रदूषण वाढीला कारणीभूत ठरत आहे. हा धूर मानवी आरोग्यासही घातक ठरत आहे. वाहनांच्या सर्वाधिक हवा प्रदूषण होत आहे. वाहतूक कोंडीमध्ये खोळंबणाऱ्या वाहनांमधून बाहेर पडणाऱ्या धूराचे प्रमाण अधिक असून त्यामुळे हवेची गुणवत्ता खालावत आहे. यामुळे मानवी आरोग्यालाही धोका निर्माण होत असल्याते मत पर्यावरण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

## मुंबई, ठाण्यात उन्हाचा पारा वाढल्याने नागरिकांसह भटक्या प्राण्यांनाही उष्णतेची झळ



**■ ठाणे, विशाल कारंडे:** गेल्याकाही दिवसांपासून मुंबई, ठाण्यात उन्हाचा पारा वाढत असताना उष्णतेचा फटका नागरिकांसह भटक्या प्राण्यांनाही सहन करावा लागत आहे. १० ते १६ एप्रिल या सहा दिवसांत भटक्या प्राण्यांच्या निर्जलीकरणाची ३१६ प्रकरणे मुंबई, ठाणे जिल्ह्यात समोर आली आहेत. यामध्ये श्वान आणि मांजरींचे प्रमाण अधिक आहे.

काही भटके प्राणी उष्णतेपासून बचावासाठी वाहनाखाली बसलेले असतात. या वाहनांच्या चाकाखाली येऊन प्राण्यांचे अपघातही होऊ लागली आहेत. त्यामुळे दुहेरी संकट प्राण्यांवर ओढावत आहे. श्वान आणि मांजरींप्रमाणे गाई, बैल, गाढव यांसारख्या मोठ्या प्राण्यांनाही फटका बसत आहे.

गेल्याकाही दिवसांपासून तापमान वाढत आहे. नागरिकांना या उन्हाचे चटके सहन करावे लागत आहे. त्यामुळे दुपारी अनेकजण घराबाहेर पडणे टाळत आहेत. माणसांच्या डोक्यावर छप्पर आहे. परंतु भटक्या प्राण्यांना सावली आणि पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे चित्र आहे.

प्राण्यांच्या संरक्षणासाठी काम करणाऱ्या सिटीजन्स फॉर ॲनिमल फाऊंडेशन (कॅप) या स्वयंसेवी संस्थेकडे १० ते १६ एप्रिल या कालावधीत प्राण्यांच्या निर्जलीकरणाच्या ३१६ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक प्रकरणे श्वान आणि मांजरींची आहेत. ३१६ पैकी ९५ तक्रारी ठाणे जिल्ह्यातील आहेत.

यामध्ये ६३ श्वान आणि ४२ मांजरींचा सामावेश आहे. त्याप्रमाणे पाच कबुतर, दोन खारी, चार ते पाच कावळे निर्जलीकरणाचा फटका बसला आहे. या संस्थेचे स्वंयसेवक वाहनाने ठिकठिकाणी फिरत असताना ही प्रकरणे आढळून आली आहेत. त्यामुळे निर्जलीकरणाची प्रकरणे आणखी जास्त असू शकतात. असा अंदाज वर्तविला जात आहे. ठाण्यातील पशू वैद्यकीय रुग्णालयांत उष्माघाताची प्रकरणे देखील वाढत असल्याचे डॉ. सुहास राणे यांनी सांगितले.

## पनवेल स्थानकातील बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई करूनही त्यांची मुजोरी कायम, प्रवाशांचे हाल

**■ पनवेल, भावना जैन:** रेल्वे स्थानकामध्ये प्रवेश करण्यापूर्वी पायी चालणाऱ्या प्रवाशांची वाट तीन आसनी रिक्षाचालकांनी अडवली आहे. सध्या तीन आसनी रिक्षांना स्थानक परिसरात काम सुरू असल्याने प्रवेशबंदी केल्याने काही रिक्षाचालकांनी पादचाऱ्यांची वाट अडवून पोलिसांच्या कारवाईला ठेंगा दाखविला आहे. वाहतूक पोलिसांना याबाबत विचारल्यावर त्यांनी बेशिस्त चालकांवर कारवाई सुरू असल्याची माहिती देतात.

पनवेल स्थानक परिसरात बहुउद्देशीय मार्गिकेच्या विस्तारीकरणाचे काम असल्याने स्थानकात रेल्वे पकडण्यासाठी वृद्ध, बालक व अपंगांना स्थानक गाठण्यासाठी दिव्य पार



करावे लागते. सुमारे काही मीटर अंतर हातामध्ये ओझे घेऊन चालणाऱ्या प्रवाशांना स्थानकाकडे जाणाऱ्या वाटेत रिक्षांना वळसा घालून जावे लागते. काही रिक्षाचालक त्यांची वाहने बेकायदा पद्धतीने स्थानकापर्यंत घालतात. सामान्य प्रवासी मात्र वाट काढत स्थानकापर्यंत जातो.

बेशिस्त पार्किंग व्यवस्था, रेल्वे प्रशासनाचा अनियोजित कारभार आणि रेल्वे तसेच वाहतूक पोलिसांची सातत्याची कारवाई नसल्याने या असमन्वयाच्या कारभारात सामान्य प्रवासी भरडले जात आहेत. सामान्यांची वाट अडवणाऱ्या या रिक्षाचालकांवर वाहतूक पोलीस कारवाई करतील का, हा प्रश्न आहे.

विशेष म्हणजे स्थानक परिसरात व्यवसाय करणारे रिक्षाचालक प्रवाशांकडून मीटरप्रमाणे भाडे आकारत नाहीत. रात्रीच्या वेळेस बोलीभाडे पद्धतीने अवाजवी भाडे आकारले जातात. रिक्षाचालक नियमाप्रमाणे व्यवसाय करत नाहीत, याला पनवेलचा प्रादेशिक परिवहन विभागसुद्धा जबाबदार आहे. या विभागाच्या अधिकाऱ्यांनी या समस्येकडे गांभीयार्ने वेळीच लक्ष न घातल्याने ही परिस्थिती हाताबाहेर गेली आहे.

## वसई–विरार शहरातील पाणीपुरवठा २ दिवस राहणार बंद

**■ विरार, दिगंबर जाधव :** वसई, विरार शहरातील पाणीपुरवठा शुक्रवार आणि शनिवार असा एकूण ३० तास बंद राहणार असल्याचे महापालिकेने जाहीर केले आहे. एमएमआरडीएतर्फे उपलब्ध झालेल्या अतिरिक्त पाण्याची उचल करण्यासाठी सूर्याच्या मुख्य जलवाहिनीला जोडणी करण्याचे काम पालिकेतर्फे हाती घेण्यात येणार आहे. यासाठी पाणीपुरवठा बंद ठेवणार असल्याचे पालिकेने जाहीर केले आहे. ऐन उन्हाळ्यात पाण्याअभावी पाणी हाल होणार असल्याने नागरिकांना चिंता वाटणार आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेस सूर्या टप्पा १ व ३ या योजनेतून २०० द.ल.ली. (एमएलडी) प्रतिदिन पाणी उपलब्ध



होते. तर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वसई-विरार महानगरपालिकेला सुर्याच्या १७० द.ल.ली. पाणीपुरवठा योजनेतून ८० ते ९० द.ल.ली. पाणी सद्यस्थितीत उपलब्ध होत आहे. त्यामुळे उर्वरित अतिरिक्त पाणी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने काशिदकोपर एमबीआर येथे सुर्या योजनेतील मुख्य जलवाहिनीस शुक्रवारी जोडणीचे काम पालिकेतर्फे हाती घेण्यात येणार आहे. या कामाकरीता सुर्या टप्पा-१ व टप्पा-३ सह मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सुर्या योजनेतून होणारा संपूर्ण पाणीपुरवठा १९ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता ते २० एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत असा ३० तास बंद ठेवण्यात येणार असल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने जाहीर केले आहे. तसेच त्यानंतर पाणी पुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील २ दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा शहरास होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी उपलब्ध पाणी जपून वापरावे व महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन पालिकेने केले आहे. मागील आठवड्यातदेखील कमी दाबाने पाणी पुरवठा झाला होता. तसेच या आठवड्यातदेखील कमी दाबाने आणि सलग दोन दिवस पाणी बंद ठेवणार असल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

## कल्याणमध्ये विजेचा लपंडाव, उकाड्याने नागरिक त्रस्त



**■ कल्याण, रोहित जैसवाल :** उकाड्याने नागरिक हैराण झाले असतानाच कल्याण पूर्व, पश्चिम भागात मंगळवार पासून विजेचा लपंडाव सुरू आहे. बुधवारी पहाटे तीन वाजता कल्याण पूर्व भागाचा वीज पुरवठा अचानक खंडित झाला होता. विजेच्या सततच्या लपंडावामुळे कल्याण मधील नागरिक दोन दिवस हैराण आहेत. कल्याण परिसरातील तापमानाचा पारा मागील तीन दिवसांपासून ४२ अंशच्या पुढे गेला आहे. घरात पंख्याखाली असूनही नागरिक उन्हाच्या झळांनी हैराण आहेत. अशा परिस्थितीत कल्याण पश्चिमेत मंगळवारी दुपारपासून चिकणघर, रामबाग, खडकपाडा भागात विजेचा लपंडाव सुरू होता. रात्रीच्या वेळेत दुगाडी किल्ला भाग, खडकपाडा भागात वीज पुरवठा बंद झाला होता. बुधवारी कल्याण पूर्व भागाचा वीज पुरवठा पहाटे तीन वाजण्याच्या दरम्यान बंद झाला होता. अगोदरच अंगाची काहिली होत असताना त्यात वीज गेल्याने नागरिक हैराण झाले होते. अनेक नागरिक पहाटे, रात्री घराबाहेरील मोकळ्या जागेत उकाड्याची काहिली शमविण्यासाठी बसले होते. घरातील लहान मुले, बालके वीज पुरवठा बंद झाल्याने अस्वस्थ होती. घरात बिछान्याला खिळून असलेले, उपचार घेत असलेले विविध प्रकारचे रुग्ण उकाड्याने हैराण झाले होते. वीज पुरवठा बंद असल्याने घराचे दरवाजे, खिडक्या मोकळ्या हवेसाठी उघड्या ठेवल्या तर घरात डासांचा उपद्रव होईल या भीतीने कोणीही नागरिक दरवाजे, खिडक्यांची फडताळे उघडण्यास तयार नव्हता. कडक उन्हाळा सुरू होताच विजेचा लपंडाव सुरू झाल्याने नागरिक तीव्र नाराजी व्यक्त करत होते. वीज पुरवठा बंद झाल्याने नागरिकांनी महावितरणच्या कार्यालयात सतत संपर्क करणे चालू ठेवल्याने महावितरणचा सेवा संपर्क क्रमांक दोन ते तीन तास व्यस्त येत होता. नागरिकांच्या वाढत्या तक्रारी विचारात घेऊन महावितरणचे कर्मचारी रात्रीतून खंडित वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी रात्रीच बाहेर पडले होते. या कर्मचाऱ्यांच्या प्रयत्न मुळे टप्प्याने कल्याण पूर्व, पश्चिमेचा वीज पुरवठा टप्प्याने पूर्ववत झाला. त्यानंतर नागरिकांना सुटकेचा निश्वास सोडला. प्रमाणापेक्षा विजेची मागणी वाढल्याने असे प्रकार घडतात. किंवा तांत्रिक अडचणीमुळे वीज पुरवठा बंद होतो, असे महावितरणच्या अधिकाऱ्याने सांगितले.

## प्रेमभंगानंतर जर मुलाने आत्महत्या केल्यास मुलीला दोषी मानता येणार नाही : दिल्ली उच्च न्यायालय

**■ नवी दिल्ली, प्रगती शर्मा :** प्रेम प्रकरणात अपयशी झाल्यानंतर मुलगा किंवा मुलगी आपला जीव देत असतात. प्रेमभंगात आत्महत्या केल्यानंतर समोरील व्यक्तीला दोषी ठरवलं जातं. या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने प्रेमसंबंधांवर महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे.

''कमकुवत मानसिकतेच्या व्यक्तीने असे पाऊल उचलले,




तर त्यासाठी इतर कोणालाही दोषी ठरवता येणार नाही, असे उच्च न्यायालयात सुनावणी करताना न्यायमूर्ती अमित महाजन यांनी म्हटले आहे.''

प्रेमात अपयश आल्यावर तरुणाने आत्महत्या केली तर मुलीला दोषी धरले जाऊ शकत नाही. एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने म्हटलंय. एका प्रकरणात एका मुलाने आत्महत्या केली होती. त्याच्या मृतदेहाजवळ एक सुसाईड नोट मिळाली होती. त्या नोटमध्ये महिलेसह एका व्यक्तीला आत्महत्येप्रकरणी जबाबदार मानले होते. याप्रकरणी दिल्ली हायकोर्टने हा निर्णय दिलाय.

## मुंबई विमानतळावर बीएमडब्ल्यू कारमध्ये सापडले यूएस् बनावटीचे पिस्तूल अन् पाच जिवंत काडतुसे, तिघांना अटक



**■ मुंबई, विशाल पाटील:** मुंबई शहराच्या विमानतळाबाहेर नंबर प्लेट नसलेल्या बीएमडब्ल्यू मधून पाच जिवंत काडतुसे व अमेरिकन बनावटीचे पिस्तूल जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी कार मालक आणि पुण्यातील रिअल इस्टेट ब्रोकर तुषार काळे (वय-४१), सचिन पोटे (४४), आकाश शिंदे (२८) यांना शस्त्रास्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करुन अटक केली आहे. याबाबतचे वृत्त एका इंग्रजी वृत्तपत्राने दिले आहे.

पोलिसांनी तुषार काळे याच्याकडे चौकशी केली असता, त्याने उत्तर प्रदेशातील एका व्यक्तीकडून पिस्टल विकत घेतले. रविवारी पहाटे २.५० च्या सुमारास विमानतळाजवळील मल्टी लेव्हल कार पार्कींमध्ये नंबर प्लेट नसलेले वाहन पाहून सुरक्षा अधिकारी सतीश पाशिलकर व अक्षय गोटेकर यांना संशय आला. त्यांनी कारची झडती घेतली.

पोलिसांना कारच्या ग्लोव्ह बॉक्समध्ये यूएस बनावटीचे ७.६५ कॅलिबरचे पिस्तूल आढळून आले ज्यामध्ये ७७.६५ एमएमचे पाच जिवंत काडतुसे होती. परिमंडळ (झोन) ८चे पोलीस उपायुक्त दीक्षित गेडाम यांनी सांगितले की, दोन सुरक्षा अधिकाऱ्यांना विमानतळावर एक इटह कारमध्ये पाच गोळ्या असलेले यूएस बनावटीचे पिस्टल सापडले. वाहन परवाना प्लेटशिवाय पार्किंगच्या ठिकाणी नेले जात होते. त्यानंतर त्यांनी याबद्दल विमानतळ पोलिसांना कल्पना दिली. आम्ही अटक केलेल्या पुण्यातील तुषार काळे हा मुंबईत कशासाठी आला होता याचा तपास पोलीस करत आहेत.

## कळमन्यातील स्ट्राँग रूमला सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह ३ स्तरीय पोलिसांचे असणार सुरक्षा कवच : पो.आयु.डॉ. रवींद्रकुमार सिंगल



**■ नागपूर, नितीन देवळेकर :** लोकसभा मतदान प्रक्रियेपासून तर निकालापर्यंत पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त राहणार आहे. नागपूर आणि रामटेक या दोन्ही मतदारसंघात दहा हजारांच्यावर पोलिस अधिकारी, कर्मचारी, निमलष्करी दल, केंद्रीय सशस्त्र दलाचा बंदोबस्त असणार आहे. कळमन्यातील स्ट्राँग रूमला सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह तीन स्तरीय पोलिसांचे सुरक्षा कवच राहणार असल्याची माहिती पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल आणि पोलिस अधिक्षक हर्ष पोद्दार यांनी पत्रपरिषदेत दिली. डॉ. सिंगल म्हणाले, शहरात ८३९ इमारतीत २ हजार ७६५ मतदान केंद्र आहेत. मतदान केंद्र, संवेदनशील परिसर, महत्त्वाच्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त राहणार आहे. १६२५ गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाई केली आहे. यात २ हजार १९३ शस्त्र तर महिन्याभरात ८ पिस्तूल आणि ८ गोळ्या जप्त करण्यात आल्याची माहिती डॉ. सिंगल यांनी दिली. पत्रपरिषदेला सहपोलिस आयुक्त अश्वती दोरजे, अप्पर पोलिस आयुक्त संजय पाटील, गुन्हे शाखेचे उपायुक्त निमित गोयल, विशेष शाखेच्या श्वेता खेडकर उपस्थित होत्या. तीन अप्पर पोलिस आयुक्त यांच्या देखरेखीत १० पोलिस उपायुक्त, १७ सहाय्यक पोलिस आयुक्त, पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक असे एकूण ३२१ पोलिस अधिकारी तसेच ३ हजार २१८ पोलिस अंमलदार व ९४३ महिला पोलिस व साध्या वेशातील पोलिसही बंदोबस्तात असतील. संपूर्ण रामटेक लोकसभा मतदारसंघात कडेकोट पोलिस बंदोबस्त आहे. जिल्ह्याच्या सीमेवरून संशयास्पदरित्या हालचालींवर विशेष लक्ष असल्याचे पोलिस अधिक्षक हर्ष पोद्दार यांनी पत्रपरिषदेत सांगितले. याशिवाय निमलष्करी दलाचे म्हणजे सीआयएसएफचे दोन कंपन्या, आरपीएफ-१ आणि कर्नाटक राज्य पोलिसांच्या दोन कंपन्यांवर सुरक्षेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. शहर पोलिसांच्या मदतीला राज्यातील १३५० आणि छत्तीसगड राज्यातील ५०० होमगार्ड सैनिक नियुक्त करण्यात आले आहेत. असे एकूण ६ हजार ३१९ पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे.

## नाशिकमध्ये अव्वाच्या सव्वा पटीने सावकारी वसुली करणारे अवैध सावकार पोलिसांच्या रडारवर

**■ नाशिक, सचिन कदम:** अवैध सावकारी जाचाला कंटाळून गेल्या वर्षभरात आठ ते दहा कर्जदारांनी आत्महत्या केल्या आहेत. तर या अवैध सावकारांकडून कर्जदारांना धमकी तसेच कुटुंबीयांची छळवणूक जबरदस्तीने प्रॉपर्टीवर कब्जा करण्याचा प्रकार दिवसेंदिवस वाढू लागला आहे. यामुळे दिवसेंदिवस कर्जदारांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. अव्वाच्या सव्वा पटीने सावकारी वसुली तसेच नागरिकांची छळवणूक करणाऱ्या सावकारांविरोधात आता पोलिसांनी कारवाईचा बडगा उचलला आहे. अंबड, इंदिरा नगर पोलिसांकडून आता परिसरातील सावकारांची यादी मागविणार असल्याचे समजते आहे.

संपूर्ण नाशिक शहरात सध्या अवैध सावकारांचा गैरव्यवहार दिवसेंदिवस वाढत आहे. प्रति महिना ५ टक्क्यांपासून २० टक्के दराने अवैध सावकार कर्जदारांना कर्ज देतात. या बदल्यात काही सावकार तर चक्क वस्तू,

> ''अवैध पद्धतीने कोणी सावकारी धंदा करून नागरिकांना धमक्या तसेच छळवणूक करीत असल्यास अशा सावकारांविरोधात नागरिकांनी थेट पोलिसांना तक्रार करावी, अशा अवैध सावकारांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.''
>
> **-शेखर देशमुख, सहायक पोलिस आयुक्त**

घरे, सोने गाड्याही गहाण ठेवतात. परिणामी कर्जदारांना व्याज तसेच मुद्दल देण्यास विलंब झाल्यास या अवैध सावकारांकडून थेट दाम दुप्पट पैसे आकारले जातात.

दोन ते तीन महिने दिल्यास गहाण ठेवलेल्या वस्तूंचा सावकारांकडून लिलाव केला जातो. सावकारांच्या या जाचाला कंटाळून सिडको, सातपूर इंदिरा नगर परिसरात गेल्या वर्षभरात आठ ते दहा आत्महत्या झाल्या आहेत. या अवैध सावकारीमुळे अनेक कुटुंब उद्धवस्त होताना दिसून येत आहेत. दोन धंदे करणारे गुंड, तसेच राजकीय नेत्यांचे काही पंटर लोक हा अवैध सावकारीचा



काळा धंदा सर्रासपणे चालवत आहेत. दिवसेंदिवस ही अवैध सावकारी फोफावत असल्याने यापुढे अनेक कुटुंब उद्धवस्त होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. याबाबत सहकार विभागाच्या उपनिबंधक कार्यालयाकडूनही कोणतीही कारवाई होत नाही.

यामुळे अव्वाच्या सव्वा पटीने वसुली करून कुटुंबीयांना कोणी धमकावत असेल तर अशा सावकारांविरोधात नागरिकांनी पोलिसांकडे तक्रार करावी, अशा सावकारांवर लगेचच कारवाई केली जाईल, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली. यामुळे आता अवैध सावकार पोलिसांच्या रडारवर आल्याने अवैध सावकारांचे धाबे दणाणणार आहेत.

## पुणे शहरातील हडपसरमध्ये सलग २ दिवस गोळीबारामुळे परिसरात भीतीचे वातावरण




**■ पुणे, अभिजित येरल्लू:** पुण्यात मंगळवारी सायंकाळी बांधकाम व्यावसायिकावर गोळीबाराचा प्रयत्न झाला. त्यानंतर बुधवारी पुन्हा एकदा गोळीबाराची घटना समोर आली. पुण्यातील हडपसरमध्ये ही गोळीबार झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सलग दोन दिवसाच्या गोळीबाराच्या घटनेनेमुळे लोकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे.

पुण्यात मंगळवारी संध्याकाळी बांधकाम व्यावसायिकावर गोळीबाराचा प्रयत्न झाला. जंगली महाराज रस्त्यावर असलेल्या वन प्लस शोरुम समोर हा धक्कादायक प्रकार घडला. त्यानंतर दुसऱ्यादिवशी गोळीबाराची घटना घडली. पुण्यातील हडपसरमध्ये बुधवारी गोळीबाराची घटना घडली.

पुण्यातील हडपसरमधील शेवाळवाडीतील नंदिनी सोसायटीसमोर ही गोळीबाराची घटना घडली. व्यावसायिक वादातून एका माजी सैनिकाने गोळीबार केला. माजी सैनिक जयवंत खलाटे यांच्यावर आरोपी माजी सैनिक सुधीर शेडगे या आरोपीने गोळीबार केला. खलाटे आणि शेडगे दोघेही माजी सैनिक आहेत. पुण्यात सलग दुसऱ्या दिवशी गोळीबाराची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.


पुण्यातील बांधकाम व्यावसायिक धीरज दिनेशचंद्र आरगडे यांच्यावर स्विगीचे वस्त्र परिधान करून दुचाकीवरून आलेल्या दोघांनी गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. हल्लेखोरांनी डोक्यात हेल्मेट घातले होते. या दोघांनी पिस्तूल काढून दोन गोळ्या झाडण्याचा प्रयत्न केला. मात्र, गोळीबार न झाल्याने दोन्ही आरोपी पळून गेले. हा सर्व प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

//सुविचार 'लोक आपल्यावर दगडफेक करतील तर, आपण त्या दगडाला मैलाचा दगड बनवा...' //



# रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी करा 'ही' योगासने

रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी कोणतीही औषधे घेण्यापेक्षा योगासन करणे फायदेशीर आहे. योगासने दररोज केल्यास प्रतिकारशक्ती वाढते. जाणून घेऊयात काही योगासने...



**उष्ट्रासन योग**

गुडघ्यावर उभे राहा. आता मागच्या बाजूला वाकून हाताने टाचांना पकडण्याचा प्रयत्न करा. डोके आणि पाठीच्या कण्याला जास्तीत जास्त मागे वाकवा. १०-१५ मिनिटे याच स्थितीत राहा. या योगासनामुळे दम्याच्या रुग्णांसाठी हे उत्तम आसन आहे. मधुमेहाला ठीक करते. फुफ्फुस मजबूत होते.

**पर्वतासन योग**

उजव्या पायाला सरळ करून डाव्या पायाजवळ ठेवा. शरीराला हातावर संतुलित करा. आता कंबरेच्या भागाला जास्तीत जास्त वरच्या बाजूला उचला. डोके दोन्ही हातांमध्ये आणा. हातांना सरळ ठेवा आणि टाचा जमिनीला टेकवा. कंबरेला वर उचलत हळूहळू श्वास सोडा. या योगासनामुळे रक्तप्रवाहामध्ये वाढ होते. दृष्टी चांगली होते. शरीराची लवचिकता वाढते.

**सुप्त वज्रासन योग**

वज्रासनात बसताना लक्षात ठेवा की, गुडघे आणि बोटे एकमेकाला चिकटलेली असावी. हळूहळू हाताला मागे घेऊन जमिनीला टेकवा. मान वर उचला आणि दीर्घ श्वास घ्या. यामुळे छातीला फुगवून शरीरात ऑक्सिजन वाढवते. बद्धकोष्ठता दूर करते. मेरुदंडाला फायदा होतो.



आरोग्यासाठी दही खाणे उत्तम आहे हे तर सर्वांना माहीत आहे पण दह्याने त्वचा आणि केसांचेही सौंदर्य वाढते हे कमी लोकांना माहीत असेल. नियमित दही लावल्याने चेहऱ्यावर ग्लो येतो आणि केसांवर वापरल्याने डेड्रफ दूर होतो आणि केसही मजबूत होतात. तर आता साबण आणि शॅम्पूवर खर्च करणे सोडून दही लावा आणि जाणून घ्या किती गुणकारी आहे हे ते...

# हे जाणून घेतल्यावर लगेच लावाल केसांना दही

**केसांसाठी कंडिशनर**

हे केसांसाठी नैसर्गिक कंडिशनरचे काम करते. पूर्ण केसांवर दही लावून शॉवर कॅप लावून घ्या. ३० मिनिटांनी केस धुवून टाका.

**केस होतील मुलायम**

दह्याला मधात मिसळून मास्क तयार करा. हे केसांना लावल्याने केस मुलायम होतील. हे १५ ते २० मिनिटापर्यंत केसांना लावून ठेवावे नंतर धुवून घ्यावे.

**केसांमध्ये चमकसाठी**

केसांना मॉइश्चराइज करून चमक आण्यायची असेल तर दह्याला मायोनीजबरोबर मिसळावे. हे मिश्रण केसांच्या शेवटच्या कोपऱ्यापर्यंत लावावे. अर्ध्या तासाने केस सामान्य पाण्याने धुवून टाकावे.

**दोन तोंडी केसांपासून मुक्ती**

आठवड्यातून दोन दिवस केसांमध्ये दही लावा, आपली दोन तोंड असलेल्या केसांची समस्या सुटेल. केस मजबूत होतील.





**कोंड्यापासून सुटका**

कोंड्याची समस्या असल्यास दही आणि लिंबाची पेस्ट लावल्याने आराम मिळेल. आठवड्यातून दोनदा हा उपाय अमलात आणा.

**केस गळतीवर असरदार**

कढीपत्ता दह्यात मिसळून पूर्ण केसांवर लावल्याने केस गळतीवर फायदा मिळेल तसेच पांढऱ्या केसांपासून मुक्तीही मिळेल.




**केस वाढीसाठी**

दही, नारळाचे तेल आणि जास्वंद फुलाची पाने मिसळून पेस्ट तयार करा. ही पेस्ट केसांना लावून १ ते २ तासांसाठी तसेच राहून द्या. नंतर केस धुवून कंडिशनर लावून घ्या.

# मधल्या वेळेच्या भुकेसाठी सेवन करावेत हे 'स्नॅक्स'

**सकाळचा** भरपेट नाश्ता, दुपारचे आणि रात्रीचे भोजन, ही आपल्या दिनक्रमातील तीन महत्त्वाची भोजने मानली गेली आहेत. या तीन भोजनांच्या व्यतिरिक्त मधल्या वेळी लागणाऱ्या भुकेसाठी काही खाल्ले गेले नाही, तर पुढील भोजनाच्या वेळी जास्त भूक लागल्यामुळे प्रमाणाबाहेर जास्त भोजन घेतले जाते. परिणामी अपचन, ॲसिडिटी सारख्या समस्या उद्भवतात. तसेच अधून मधून लागणाऱ्या भुकेवर उपाय म्हणून चिप्स, भजी, वडापाव, सामोसे अशा पदार्थांची जोड अनेकदा आपण देत असतो. मधल्या वेळी खाल्ल्या गेलेल्या अशा पदार्थांमुळे वजन वाढण्यास सुरुवात होते. त्यामुळे मधल्या वेळेची भूक शमवण्यासाठी असे पदार्थ आहारामध्ये समाविष्ट केले जावेत, जे पचण्यास हलके असतील आणि ज्यांच्या सेवनामुळे वजनही वाढणार नाही. मधल्या वेळेच्या भुकेसाठी सुका मेवा हा चांगला पर्याय ठरू शकतो. अक्रोड, बदाम, शेंगदाणे, खारीक इत्यादी सुका मेवा आरोग्याच्या दृष्टीनेही उत्तम आहे. या मेव्यातून शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे, प्रथिने, फायबर आणि ओमेगा थ्री मिळत असतात. त्यामुळे सुक्या मेव्याच्या सेवनाने भूकही शमते आणि शरीराला पोषण मिळते. याव्यतिरिक्त पनीर मधल्या वेळेच्या भुकेसाठी चांगला पर्याय आहे. पनीरमध्ये प्रथिने असून, यामुळे भूक लवकर शमते. शरीरातील स्नायूंच्या बळकटीसाठी प्रथिने आवश्यक असून, ही प्रथिने पनीरसारख्या पदार्थांमधून मिळतात. पनीर कच्चे किंवा ग्रिलवर भाजून घेऊन सॅलड बरोबर खाता येऊ शकते. भाजलेले किंवा कच्चे चणे, कच्चे हरभरे, फुटाणे हा ही पर्याय मधल्या वेळेच्या भुकेसाठी चांगला. यामध्ये प्रथिनांच्या जोडीने फायबर, क्षार आणि जीवनसत्त्वे आहेत. यांच्या सेवनाने ब्लडशुगर लेव्हल्स नियंत्रित राहण्यास मदत होते. रताळ्यामध्ये सावकाश पचणारी कर्बोदके आणि डायटरी फायबरची मात्रा अधिक असून, शरीराला सक्रिय ठेवणारी ऊर्जा यातून मिळते. मधल्या वेळेच्या भुकेसाठी ताजी फळे हा देखील उत्तम पर्याय आहे. तसेच फळे आपल्यासोबत कुठेही नेता येणे शक्य असल्याने कामानिमित्त बाहेर पडण्याची वेळ आली तरी मधल्या वेळेची भूक भागवण्यासाठी हा उत्तम, पौष्टिक पर्याय आहे.



# तुमचा 'संतुलित' आहार आजारपणास कारणीभूत ठरत नाही ना?

संतुलित आणि योग्य आहार म्हणजे नेमके काय आणि त्याचा अवलंब कसा करावा याबद्दल आहारशास्त्रामध्ये अनेक पर्याय सुचवले गेले आहेत. अशा या निरनिराळ्या पयार्यांमुळे योग्य आहार नेमका कसा असावा याबद्दल मनामध्ये खूप गोंधळ उडणे साहजिक आहे. उदाहरण द्यायचे झाले, तर वाईनचे देता येईल. आहारशास्त्रातील एका अभ्यासकाच्या मते वाईनच्या मर्यादित सेवनाने दातांमधील व हिरड्यांमधील हानीकारक जीवाणूंचा नाश होतो तर आणखी एका रिसर्चच्या मते आहारातील वाईनचे सेवन त्वचेच्या कर्करोगाला कारणीभूत ठरू शकते.



**अधून**मधून काही ठरावीक तऱ्हेचे डायट शरीराच्या, आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगले असल्याचे ऐकिवात येत असते. उदाहरणार्थ फ्रूट डायट किंवा आहारामध्ये डार्क चॉकलेट किंवा समुद्री मिठाचा वापर करणे अशा प्रकारचे सल्ले दिले जात असतात. पण अशा प्रकारची डायट किंवा असे अन्नपदार्थ खरोखरच शरीराच्या दृष्टीने फायदेशीर आहेत किंवा नाही याचा विचार करणे अगत्याचे ठरते. डार्क चॉकलेटमध्ये ॲंटी ऑक्सिडंट्स असून साखरेचे प्रमाण देखील यामध्ये कमी असते. पण तरीही यामध्ये कॅलरीजचे प्रमाण लक्षणीय असल्याने याचे सेवनदेखील इतर गोड पदार्थांप्रमाणे, मर्यादित प्रमाणात करायला हवे, असे आहारतज्ज्ञ म्हणतात. तसेच आजकाल मैद्याने बनवलेल्या ब्रेड ऐवजी मल्टी ग्रेन ब्रेड किंवा होल व्हीट ब्रेड जास्त पौष्टिक समजला जातो. पण ब्रेड जरी कोणत्याही प्रकारचा असला, तरी त्यामध्ये साखर, ट्रान्स फॅट्स आणि काही प्रमाणात मैदा असतोच हे लक्षात घ्यायला हवे. होल व्हीट ब्रेडमध्ये फायबरचे प्रमाण जास्त आहे, आणि जीवनसत्त्वे देखील यामध्ये आहेत. तसेच मल्टी ग्रेन ब्रेड, लो ग्लायसेमिक इंडेक्स असलेल्या धान्यांपासून बनवला जातो. पण तरीही काही प्रमाणात ट्रान्सफॅट आणि मैदा यांचा वापर यामध्ये केलेला असतो. त्याचप्रमाणे न्यूट्रिशन बार्सदेखील प्रमाणामध्ये सेवन करणे आवश्यक आहे, कारण यामध्ये साखर आणि फॅटचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे जेव्हा त्वरित ऊर्जेची, म्हणजे एनर्जीची आवश्यकता असेल आणि इतर कोणताही पर्याय उपलब्ध नसेल, तेव्हाच एनर्जी बार्सचे सेवन केले जावे. फळे आरोग्यासाठी उत्तम आहेत, हे आपल्याला ठाऊक आहे, पण फळांमध्ये देखील साखरेचे प्रमाण असतेच. त्यामुळे फळे किती आणि कधी खाल्ली जावीत याचा विचार करणे गरजेचे आहे. फळांचे सेवन शक्यतो दिवसाच्या सुरुवातीला केले जावे. सकाळी फळे खाल्ली जात नसल्यास त्यांचे सेवन शक्यतो दिवसाच्या पूर्वार्धात होईल असे पाहावे. त्याचप्रमाणे समुद्री मीठ हे सामान्य मिठाच्या मानाने जास्त आरोग्यदायी आहे असे समजले जाते. खरे तर दोन्ही प्रकारच्या मिठांमध्ये सोडियमची मात्रा चाळीस टक्के, म्हणजे एका टीस्पूनमध्ये २३०० मिलीग्राम इतकी आहे. पण समुद्री मिठाचे कण आकाराने मोठे असल्याने ते आपोआपच कमी वापरले जाते. पण म्हणून सामान्य मीठ वापरण्यात देखील काही अपाय नाही. मुळातच आहारामध्ये मिठाचे प्रमाण मर्यादित असायला हवे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदीनंतर अमिताभ बच्चन यांना यंदाचा लता मंगेशकर पुरस्कार जाहीर



बॉलीवूडचे महानायक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमिताभ बच्चन यांचा जलवा अजूनही कायम आहे. त्यांना ही नावं आणि प्रसिद्धी इतक्या सहजासहजी मिळाली नाहीत. प्रत्येक कलाकारांच्या वाटेला संघर्ष असतोच. तसाच बिग बींना देखील करिअरच्या सुरुवातीपासूनच खूप संघर्ष करावा लागला. या सिनेसृष्टीत त्यांना जवळपास पाच दशक पूर्ण झाली आहेत. या पाच दशकात त्यांनी अनेक हिट चित्रपट दिले आहेत. त्यामुळे सिनेसृष्टीतील बिग बींच्या या कारकीर्दीबद्दल आणि योगदानाबद्दल यंदा त्यांना लता दीनानाथ मंगेशकर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

गेल्यावर्षी लता दीनानाथ मंगेशकर हा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रदान करण्यात आला होता. यंदा हा पुरस्कार अमिताभ बच्चन यांना जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्राचा मानाचा पुरस्कार सोहळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृती पुरस्कार सोहळ्याची आज घोषणा झाली. पंडित हृदयनाथ मंगेशकर, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आणि अदिनाथ मंगेशकर यांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळ्याची घोषणा करण्यात आली.

दीनानाथ मंगेशकर यांच्या ८२व्या पुण्यतिथीनिमित्ताने येत्या २४ एप्रिलला हा पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. दीनानाथ नाट्यगृह येथे हा सोहळा रंगणार आहे. या सोहळ्यात अमिताभ बच्चन यांच्यासह संगीत, नाटक, कला, वैद्यकीय, पत्रकारीता व सामाजिक कार्य क्षेत्रातील दिग्गजांचा सत्कार होणार आहे.

**अशोक सराफ, अतुल परचुरे आणि पद्मिनी कोल्हापूरे यांचा देखील होणार गौरव**

राष्ट्रीय पुरस्कार विजेते संगीतकार ए.आर. रेहमान यांना मास्टर दीनानाथ मंगेशकर या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. याशिवाय अशोक सराफ यांना मास्टर दीनानाथ मंगेशकर प्रदीर्घ नाट्यसेवा पुरस्कार, पद्मिनी कोल्हापूरे यांना मास्टर दीनानाथ मंगेशकर प्रदीर्घ चित्रपट सेवा पुरस्कार, अतुल परचुरे यांना मास्टर दीनानाथ मंगेशकर प्रदीर्घ नाट्यसेवा पुरस्कार, रणदीप हुड्डाला मास्टर दीनानाथ मंगेशकर उत्कृष्ट चित्रपट निर्मिती विशेष पुरस्कार, भाऊ तोरसेकर यांना मास्टर दीनानाथ मंगेशकर प्रदीर्घ पत्रकारिता पुरस्कार आदी पुरस्कारांची आज घोषणा करण्यात आली आहे.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ५९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | 3 | 2 | | | 1 | |
| | 7 | 3 | | | 4 | 5 | | |
| | 1 | | 8 | | 6 | 7 | | 4 |
| | 8 | 6 | | | 2 | | 4 | |
| | 3 | 7 | | 4 | 9 | 1 | | |
| 5 | | 4 | 7 | | | | 6 | |
| | | | 1 | | | 4 | | |
| | 5 | | | | | | 8 | 2 |
| 6 | | 8 | | | 5 | | | |

## उत्तर सुडोकू -५८


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 5 | 8 | 3 | 6 | 9 | 4 | 7 | 1 |
| 4 | 7 | 1 | 5 | 2 | 8 | 6 | 3 | 9 |
| 3 | 6 | 9 | 7 | 1 | 4 | 2 | 5 | 8 |
| 5 | 8 | 6 | 4 | 3 | 2 | 1 | 9 | 7 |
| 7 | 9 | 2 | 6 | 5 | 1 | 3 | 8 | 4 |
| 1 | 4 | 3 | 8 | 9 | 7 | 5 | 2 | 6 |
| 6 | 1 | 5 | 9 | 8 | 3 | 7 | 4 | 2 |
| 8 | 2 | 7 | 1 | 4 | 5 | 9 | 6 | 3 |
| 9 | 3 | 4 | 2 | 7 | 6 | 8 | 1 | 5 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# वय हा केवळ आकडाच!

## साठीतील 'तरुणां'साठी धावून आलंय स्थळ

सुरज कांबळे, मुंबईः साधारणपणे २५ वर्षांपूर्वी आलेल्या 'कुसुम मनोहर लेले' या नाटकानं मराठी रंगभूमीवर प्रचंड वाहवा मिळवली होती. दिग्दर्शन, मांडणी, विषय, कथा आणि अभिनय यामुळे ते नाटक सरस ठरलं होतं. या नाटकाच्या निमित्तानं संजय मोने आणि डॉ. गिरीश ओक यांच्या अभिनयाची जुगलबंदी बघायला मिळाली होती. अशीच जुगलबंदी आता पुन्हा अनुभवता येणार आहे. निमित्त आहे 'स्थळ आले धावून' या नव्या नाटकाचं. या नाटकातून संजय आणि गिरीश २५ वर्षांनी पुन्हा एकदा रंगभूमीवर एकत्र दिसणार आहेत. संतोष शिदम निर्मित 'स्थळ आले धावून' या नाटकाची गेल्या काही दिवसांपासून चर्चा होतीच. या नाटकात कोण दिसणार हा प्रश्न सगळ्यांच्या मनात होता. सगळ्यात आधी 'मुंटा'नं त्यासंदर्भातली माहिती तुम्हा रसिकप्रेक्षकांच्या समोर आणली आहे. हेमंत एदलाबादकर लिखित-दिग्दर्शित हे नाटक लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. डॉ. गिरीश ओक आणि संजय मोने आतापर्यंत ५ नाटकांमध्ये एकत्र काम केलंय. ते दोघं शेवटचं एकत्र दिसले ते 'कुसुम मनोहर लेले' या गंभीर नाटकात. आता २५ वर्षांनी त्यांच्या अभिनयाची जुगलबंदी 'स्थळ आले धावून' या विनोदी नाटकात पुन्हा एकदा अनुभवता येणार आहे.



अभिनेत्री पौर्णिमा तळवलकरसुद्धा नाटकात महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. साठीत असलेल्या दोन गृहस्थांवर हे नाटक बेतलं असून वृद्धापकाळात घडणाऱ्या घटनांची ही कथा आहे. नाटकातील व्यक्तिरेखा वयस्क असल्या तरी संहिता मात्र तरुण मंडळींनासुद्धा आवडेल अशी आहे, असं नाटकाची टीम सांगते. या नाटकाची तालीम सध्या सुरू असून शुभारंभाच्या प्रयोगांची नाट्यरसिक आतुरतेनं वाट बघत आहेत. अभिनेते डॉ. गिरीश ओक यांनी अशी प्रतिक्रिया दिली की, 'मी आणि संजयने एकत्र केलेल्या नाटकांपैकी 'कुसुम मनोहर लेले' हे खास आहे. या नाटकात आम्ही भूमिकांची अदलाबदल करायचो. त्यावेळी तसं करणारे आम्ही पहिलेच होतो. बऱ्याच दिवसांनी संजय मोनेसारख्या कलाकारांसोबत काम करणार असल्यानं पुन्हा एकदा तो काळ अनुभवता येणार आहे.

## दिनविशेष

**१८ एप्रिल**

- १३३६: हरिहर व बुक्क यांनी विजयनगरच्या हिंदू राज्याची स्थापना केली.
- १७०३: औरंगजेबाने सिंहगड ताब्यात घेतला.
- १७२०: शाहू छत्रपती यांच्याकडून पहिले बाजीराव पेशवे यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली.
- १८३१: युनिव्हर्सिटी ऑफ अलाबामा ची स्थापना झाली.
- १८५३: मुंबईहून ठाण्यापर्यंत नियमित रेल्वे सेवा सुरू झाली.
- १८९८: जुलमी प्लेग अधिकारी रँड याचा खून करणारे दामोदर चापेकर यांना फाशी.
- १९१२: टायटॅनिक मधील वाचलेले ७०५ प्रवासी घेऊन कार्पेथिया हे जहाज न्यूयॉर्कला पोचले.
- १९२३: पुण्याच्या शिवाजी मंदिरात शिवजयंतीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यातील पहिल्या संगमरवरी अर्धपुतळ्याची स्थापना करण्यात आली.
- १९२४: सायमन व शूस्टर यांनी पहिले शब्दकोड्यांचे पुस्तक प्रकाशित केले.
- १९३०: क्रांतिकारकांनी चितगाव येथील शस्त्रागार लुटले.
- १९३०: आज काहीही बातमी नाही असे बी. बी. सी. या नभोवाणी केंद्रावरुन सांगण्यात आले.
- १९३६: पेशव्यांची राजधानी असणाया पुण्यातील शनिवारवाडा पुरातत्व विभागाकडे सुपूर्त करण्यात आला.
- १९५०: आंध्र प्रदेशातील पोचमपल्ली खेड्यातील भूदानाने विनोबा भावे यांची भूदान चळवळ सुरू झाली.
- १९५४: गामल अब्दल नासर याने इजिप्तची सत्ता ताब्यात घेतली.
- १९७१: एअर इंडियाचे पहिले बोइंग ७४७ जंबो जेट विमान सम्राट अशोक हे सांताक्रूझ विमानतळावर दाखल झाले.
- २००१: भूसंलग्न उपग्रह प्रक्षेपक GSLV- D1 वाहकाचे श्रीहरिकोटा तळावरून यशस्वी प्रक्षेपण झाले.
- १७७४: सवाई माधवराव पेशवा यांचा पुरंदर किल्ल्यावर जन्म. (मृत्यू: २७ ऑक्टोबर १७९५)
- १८५८: स्त्रीशिक्षण आणि विधवा विवाह यातील कर्ते समाजसुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा जन्म. (मृत्यू: ९ नोव्हेंबर १९६२ - मुरुड)
- १९१६: हिंदी व मराठीतील चरित्र अभिनेत्री ललिता पवार यांचा जन्म. (मृत्यू: २४ फेब्रुवारी १९९८)
- १९५८: वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू माल्कम मार्शल यांचा जन्म. (मृत्यू: ४ नोव्हेंबर १९९९)
- १९६२: हिंदी चित्रपट अभिनेत्री पूनम धिल्लन यांचा जन्म.
- १९९१: डॉ. वृषाली करी यांचा जन्म.
- १८५९: स्वातंत्रवीर सेनापती रामचंद्र पांडुरंग तथा तात्या टोपे यांचे निधन.

## भविष्य

**मेष** — तुमच्या व्यक्तिमत्वाची उत्तम छाप पडेल. व्यापारी वर्गाला चांगला आर्थिक लाभ होईल. नवीन मित्र जोडाल. झोपेची तक्रार जाणवेल.

**वृषभ** — व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. व्यावहारिक कल्पकता वापराल. पुढील गोष्टींचा अंदाज बांधवा लागेल. काही बाबी

**मिथुन** — मनातील आकांक्षा पूर्ण होतील. चांगली संगत लाभेल. कामाच्या ठिकाणी कौतुकास पात्र व्हाल. मोठ्या लोकांच्या संगतीत वावराल.

**कर्क** — मानसिक ताणापासून दूर राहावे. घरातील वडीलधार्या व्यक्तींचे मत विरोधी वाटू शकते. अंगीभूत कलागुण विकसित होण्यास वाव द्यावा. अति विचार करणे टाळावे.

**सिंह** — जोडीदाराशी विचार-विनिमय कराल. भागीदारीत नवीन योजना आमलात आणाल. मुलांच्या हट्टीपणा कडे लक्ष ठेवा. तुमच्यातील धार्मिकता वाढीस लागेल. इतरांच्या आनंदात

**कन्या** — पत्नीची प्रगती होईल. तुमचा जनसंपर्क वाढेल. सर्दी, खोकला यांसारखे त्रास संभवतात. जुगारातून लाभ संभवतो. गुंतवणुकीचा नवीन पर्याय शोधाल.

**तुला** — पत्नीचा वरचष्मा राहील. जोडीदाराचा लाडिक हट्ट पुरवावा लागेल. आरोग्यात सुधारणा होईल. जवळचा प्रवास जपून करावा. कामाचा जोम वाढेल.

**वृश्चिक** — बोलतांना सारासार विचार करून बोलावे. कसलाही उतावीळपणा करायला जाऊ नये. कौटुंबिक खर्चाचे योग्य नियोजन करावे. घरात नातेवाईक जमा होतील. दिवस हसत-खेळत घालवाल.

**धनु** — रागाचा पारा आवरता घ्यावा लागेल. आततायीपणे वागू नये. कामाचा जोम वाढीस लागेल. काही अनपेक्षित बदल संभवतात. नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे.

**मकर** — सामुदायिक गोष्टीपासून दूर राहावे. स्त्रीवर्गापासून सावधानता बाळगावी. धार्मिक यात्रा कराल. प्रवासात सावधानता बाळगावी लागेल. वादविवादात सामील होणे टाळा.

**कुंभ** — मनमोकळ्या गप्पा मारता येतील. तुमच्या संभाषण कौशल्यावर सर्व खुश होतील. व्यावहारिक चातुर्य दाखवून द्याल. कौटुंबिक जबाबदारी पेलाल. हातातील कला जोपासावी. पोटाच्या तक्रारी जाणवू शकतात.

**मीन** — वेळेचे महत्व जाणून वागावे. कोणालाही शब्द देतांना विचार करावा. व्यावसायिक लाभाचे योग्य नियोजन करावे. चटपटीत पदार्थ खाल. आवडी-निवडी बाबत दक्ष राहाल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

